ePaper
|| वर्ष - 7 | अंक - 311 || UDYAM-MH-26-0158827 ||
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार, दिनांक 31 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ठरलं! बारामतीत नणंद-भावजयीचा सामना!



## आतील पानांत


- विराट-गंभीरची गळाभेट नाटक?
- 'क्रू'ची दमदार सुरुवात
- ७५ भारतीयांची कंबोडियातून सुटका
- म्हणून मी बारामतीमधून माघार घेतोय


## आगामी विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी

# शिरुरमध्ये महायुतीला 'धक्का'!

### » लोकसभा निवडणूक रणसंग्राम : दोन माजी आमदार शरद पवार गटाच्या वाटेवर

। पुणे । महाईन्यूज

**राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ देऊनही उमेदवारीत डावलल्याने भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे नाराज असल्याच्या चर्चा आहे. त्यांच्या या नाराजीची मोठी किंमत महायुतीच्या उमेदवाराला चुकवावी लागेल असे राजकीय जाणकार सांगत आहेत. तर दुसरीकडे खासदार शरद पवार यांचे नेतृत्व स्वीकारून ते त्यांच्या पक्षात प्रवेश करण्याची शक्यता देखील वर्तविण्यात येत आहे. लांडे यांचे समर्थक नितीन सस्ते आणि ज्ञानेश्वर बोऱ्हाडे हे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारात दिसत असल्यावरून ते अधिक स्पष्ट होत आहे. तर जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे हे देखील राजकीय दृष्ट्या अस्वस्थ असून, ते देखील खासदार शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करतील अशी शक्यता आहे.**










राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून शिरूर लोकसभेला संधी मिळेल, अशी अपेक्षा माजी आमदार विलास लांडे यांची होती. त्यासाठी त्यांनी विविध माध्यमांसमोर आपला दावा करायला सुरुवात केली होती. त्यांचे समर्थक देखील लांडे यांना उमेदवारी मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे मागणी करत होते. गतवेळच्या निवडणुकीत लांडे यांना उभे केले होते. त्यांचे मतदारसंघात नातेगोते असूनही त्यांना पराभव पत्करावा लागला असा संदर्भ अजित दादांनी मंचर येथील कार्यक्रमात दिला होता. त्यामुळे लांडे यांच्याबाबत अजित पवार सुरुवातीपासूनच सकारात्मक नसल्याचे ते चित्र होते. त्यामुळे पर्यायी उमेदवाराची अजित दादांनी शोधशोध केली. खासदार अमोल कोल्हे यांच्या विरोधात माजी खासदार हेच सक्षम उमेदवार ठरतील असा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करत होते. परिणामी आढळरावांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्याचा निर्णय अजित दादांनी घेतला. पक्षात आम्ही सक्षम आहोत. आयात उमेदवार घेऊ नका असे सांगूनही लांडे यांचा हा सल्ला अजित दादांनी मनावर घेतला नाही. उमेदवार आढळरावच असतील. त्यांचे काम करावे लागेल असे सांगण्यात आले. त्यांच्या उमेदवारीच्या घोषणेनंतर माजी आमदार विलास लांडे नाराज झाले आहेत. आढळरावांच्या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमात लांडे यांची अनुपस्थिती असणे हे नाराज असल्याचेच दर्शवत आहे. त्यानंतर लांडे कोणत्याच सार्वजनिक राजकीय कार्यक्रमात दिसेनासे झाले आहेत. आगामी काळात ते महायुतीच्या उमेदवाराचे काम करतील कि नाही या बाबत शंका उपस्थित केली जात आहे. गत विधानसभेत विलास लांडे यांना सुमारे ८१ हजार मते मिळाली आहेत. त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे निवडणुकीत ही मते फिरविण्याची किमया लांडे करू शकतात असे राजकीय जाणकार सांगत आहेत. तर भोसरीतील त्यांचे समर्थक आतापासूनच खासदार अमोल कोल्हे यांचा प्रचार करत आहेत. त्यामुळे आगामी काळात लांडे यांची राजकीय दिशा तुतारीकडे जाईल असे मत व्यक्त होऊ लागले आहे.

जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे हे देखील शरद पवार यांच्याकडे जाऊ शकतील. सध्या ते स्थिर असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र लवकरच ते निर्णय घेण्याची शक्यता आहे.

## विधानसभा निवडणुकीचे गणित...

» वास्तविक, लोकसभा निवडणुकीत २०१९ आणि आताही विलास लांडे यांना संधी मिळाली. आगामी विधानसभा निवडणुकीत भोसरी विधानसभा मतदार संघ विद्यमान आमदार महेश लांडगे यांची महायुतीकडून उमेदवारी निश्चित आहे. त्यामुळे महायुतीमध्ये संधी नाही, ही बाब सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची आवश्यकता नाही. अशी परिस्थिती जुन्नरमध्ये शरद सोनवणे यांच्याबाबत होणार आहे. त्या ठिकाणी महायुतीमध्ये राष्ट्रवादीचे आमदार अतुल बनके यांचा पहिला दावा उमेदवारीवर राहणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची सोय म्हणून या दोन्ही नेत्यांना महायुतीला 'जय महाराष्ट्र' केल्याखेरीज पर्याय दिसत नाही.

## जयंत पाटील यांच्याशी जवळीक...

»माजी आमदार विलास लांडे यांचे राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी सलोख्याचे राजकीय संबंध आहेत. लांडे यांच्यावर झालेला अन्याय पाहता त्यांना शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षात येण्यासाठी मन वळविले जाण्याची शक्यता आहे. ते पक्षात गेल्यास शहरात मोठी ताकद मिळणार आहे. त्यासाठी खासदार पवार देखील ताकद देतील अशी शक्यता आहे. मात्र लांडे काय भूमिका घेतील हे आता पाहावे लागणार आहे.

# मोहोळांसाठी पाटलांच्या ‘मॅरेथॉन बैठका’!

## » मताधिक्य वाढविण्याचा संकल्प : भाजपा परिवार बैठकांचा धडाका



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली आहेत. दोन दिवस पक्षाच्या सर्व आघाड्यांच्या बैठका घेऊन मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.**

लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग मिळाला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून महायुतीने मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. शुक्रवारी महिला मोर्चा, ओबीसी मोर्चा, व्यापारी आघाडी, मंडल अध्यक्ष, विस्तारक सोशल मीडिया आणि आयटी सेल यांची बैठक घेतली. शनिवारी अनुसूचित जाती मोर्चा, झोपडपट्टी आघाडी, वैद्यकीय आघाडी, पर्यावरण आघाडी, उत्तर व दक्षिण भारतीय आघाडी, अल्पसंख्याक आघाडी, सहकार, पायाभूत सुविधा, शिक्षक भटके विमुक्त आघाडी यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन निवडणूक तयारीचा आढावा घेतला. तसेच, पदाधिकाऱ्यांच्या सूचना देखील जाणून घेतल्या.

नामदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांनी गेल्या दहा वर्षांत सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या आहेत. तसेच, वर्षानुवर्षे प्रलंबित अनेक विषय मार्गी लावले आहेत. आपल्या मानबिंदूंची पुनर्स्थापना केली आहे. त्यामुळे त्यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावे. राज्य सरकारने ही अनेक जटिल विषय मार्गी लावले आहेत. आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे यासाठी; आठ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना शिक्षण मोफत केले. आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन निधी उपलब्ध करून दिला. नुकतेच त्याचे भूमिपूजन देखील झाले.ते पुढे म्हणाले की, कोविड काळात मुरलीधर मोहोळ यांनी महापौर नात्याने पुणे शहराला केले काम फारच परिणामकारक होते. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे पुणे शहराने कोविडवर यशस्वी मात केली. पुणेकरांना याची जाणीव आहे. त्यामुळे मोदीजींना पुन्हा पंतप्रधान होण्यासाठी आणि मुरलीधर मोहोळ यांना खासदार बनविण्यासाठी पुणेकर मतदान करणारच आहेत. पण तरीही कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना दिल्या.

शहराध्यक्ष धीरज घाटे म्हणाले की, देशातील सर्वसामान्यांचा माननीय मोदीजींवर दृढ विश्वास आहे. मोदीजींनी सर्वसामान्यांचा नेहमीच विचार केला. माननीय मोदीजींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांच्या काळात देशात केलेले काम, विकास कामे सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे आवाहन केले.या बैठकीला शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, पुणे लोकसभा निवडणूक प्रभारी श्रीनाथ भिमाले, सरचिटणीस पुनीत जोशी, राघवेंद्र बापू मानकर, रवी साळेगावकर यांच्या सह भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी सर्वच आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी मुरलीधर मोहोळ विक्रमी मतांनी विजयी होतील, असा संकल्प व्यक्त केला.

### सीएए नागरिकत्व देणारा कायदा

» देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने आणलेला नागरिकता सुधारणा कायदा हा पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान आदी देशातील त्रासाला कंटाळून भारतात आलेल्या निर्वासित सहा धर्मियांना नागरिकत्व देणारा कायदा आहे. कोणाचंही नागरिकांचं नागरिकत्व काढून घेतलं जाणार नाही. त्यामुळे सीएएबद्दल जनजागृती करावी, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

### अपप्रचाराला खोडून काढा

» विरोधकांकडे मुद्दे नसल्याने, ते राज्यघटना बदलाचा अपप्रचार करत आहेत. उलट कॉंग्रेसने स्वतः च्या स्वार्थासाठी ४० वेळा घटना बदल केला. इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करुन हुकूमशाही आणली. त्यामुळे हे सर्व जनतेसमोर मांडून विरोधकांचे मुद्दे वेळीच खोडून काढा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

# अजित पवारांनी केलेल्या सर्वेक्षणात सुप्रिया सुळे आघाडीवर

## » सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदार संघामधून उमेदवारी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीला जवळपास दीड महिन्यांचा कालावधी राहिला असून राज्यात अद्यापपर्यंत कोणत्याही पक्षाचे जगावाटप पूर्णपणे झाले नाही.तर प्रत्येक राजकीय पक्षाकडून चर्चाच सुरू आहे.**

या सर्व घडामोडी दरम्यान राज्यातील सर्व जनतेचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर महायुतीकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाची अद्यापपर्यंत घोषणा जरी झाली नसली तरी सुनेत्रा पवार यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. तर बारामती लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या हवेली तालुक्यातील भेकराईनगर भागात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत, राज्यातील अनेक घडामोडी बाबत त्यांनी भूमिका देखील मांडली.राज्यातील अनेक भागातील महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहे. सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदार संघामधून महायुतीकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. मात्र अद्यापपर्यंत त्यांच्या नावाची घोषणा केली जात नाही. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, बारामती लोकसभा मतदार संघासाठी अजित पवार यांच्याकडून जे कोणी उमेदवार असतील. त्यांच्या बाबत अजित पवार यांच्याकडून ९ सर्व्हे करण्यात आले आहेत.





त्या सर्व्हेमध्ये अजित पवार यांचे उमेदवार पिछाडीवर आहेत. तर सुप्रिया सुळे या त्यांच्या सर्व्हेमध्ये आघाडीवर आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा म्हणजेच दहावा सर्व्हे करतील आणि योग्य असा निर्णय घेतील, तसेच बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे या किमान अडीच लाख मताधिक्यानी निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करत अजित पवारांना त्यांनी टोला लगावला.तसेच ते पुढे म्हणाले की, मागील काही महिन्यांत भाजपने देशात आणि राज्यात पक्ष, कुटुंब फोडाफोडीची जी कार्यपद्धती अवलंबली आहे.त्यावर भाजपचे अनेक नेते मंडळी नाराज आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मतदार मोठ्या प्रमाणावर नाराज आहे. यामुळे एकूणच परिस्थिती बघता,भाजपला त्यांचाच भाजपचा मतदार मतदान करणार नसल्याचे हे दिसून येत असल्याचे सांगत भाजप नेतृत्त्वावर त्यांनी निशाणा साधला.

### निलेश लंके शरद पवार गटा सोबत

» अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी राजीनामा देऊन शरद पवार गटा सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, आमदार निलेश हे अजित पवार यांच्याकडे होते.त्यावेळी सातत्याने निलेश लंके यांना मतदार संघातील नागरिक भेटून सांगत होते की, जर तुम्ही साहेबांसोबत असला तर आम्ही तुम्हाला मतदान करू, त्यानंतर त्यांनी लोकसभा निवडणुक लढविण्याची इच्छा बोलावून दाखवली आणि आता निलेश लंके हे साहेबासोबत आल्याने त्यांचे मताधिक्य चांगलेच असणार आहे.

# डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी 15 दिवस वेटिंग!

## मासुळकर कॉलनीतील नेत्र रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नेत्र रुग्णालयात उपचारासाठी रुग्णांची संख्या वाढल्याने डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी १५ दिवस वेटिंगवर रहावे लागत आहे. बेडची आणि कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या असल्याने दिवसाकाठी केवळ १५ शस्त्रक्रिया होत आहेत. १५ दिवसानंतरची तारिख दिल्यामुळे नागरिकांना डोळ्यांचा त्रास सहन करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे कर्मचारी संख्या वाढविण्याबरोबरच बेडची देखील संख्या वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात असणारा नेत्र विभाग मासुळकर कॉलनीतील नेत्र रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आला. सुसज्ज ४० बेडचे रुग्णालय या ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. हे रुग्णालय सुरू झाल्यानंतर त्या ठिकाणी येणाऱ्या रुग्णांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे रुग्णालय प्रशासन सांगत आहे. सध्या दिवसाकाठी ३०० रुग्णांची नोंद ओपीडी मध्ये होत आहे. दिवसाकाठी २० डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होत आहेत. तर ३८ ते ४० रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात दाखल होत आहेत. डोळ्यांच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी नागरिकांकडून नोंदणी केली जात आहे. ही संख्या वाढत असल्याने नागरिकांना १५ दिवसांपेक्षा अधिकची वेळ दिली जात आहे

रुग्णालयात सध्या अपुरा कर्मचारी वर्ग आहे. त्यामुळे दिवसभरात केवळ २० डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होत आहेत. कर्मचारी संख्या वाढविल्यास अधिक शस्त्रक्रिया होतील. त्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय देखील टळणार असल्याचे रुग्णांचे नातेवाइक सांगत आहेत. सध्या बीड, सातारा, परभणी आदीसह विविध जिल्ह्यातून नागरिक उपचारासाठी येत असल्याची माहिती रुग्णालयाच्या

### कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची गरज -

शिवसैनिकांला मुख्यमंत्री बनवतो म्हणून स्वतःच मुख्यमंत्री झाले. खुर्चीवर बसले. मला मुख्यमंत्री केले नाही, याचे दुःख नाही. परंतु, मुख्यमंत्री बनून काय कमविले याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. आरोप करून भागणार आहे का याचा विचार करावा. मी बाळासाहेब, शिवसेनेच्या भूमिकेबाबत तडजोड करणार नाही. त्यामुळे लोक माझ्यासोबत येत आहेत. खरी शिवसेना आपली आहे कारण धनुष्यबाण आपल्याकडे आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी एवढ्या पुरते माझे काम नाही. संपूर्ण महाराष्ट्र माझा परिवार आहे. घरात बसून उंटावरून शेळ्या हाकत नाही, असा टोलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगविला.

# हिंजवडी आयटी परिसरात बिबट्याचा वावर!

## नवजात बछडा तब्यात : ऊसतोड बंद ठेवण्याच्या सूचना

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



**हिंजवडी माहिती तंत्रज्ञान वाटिका (आयटी पार्क) परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे शनिवारी शिक्कामोर्तब झाले. परिसरातील एका शेतात आढळून आलेल्या बिबिट्याच्या नवजात बछड्याला वनविभाग आणि ॲनिमल रेस्क्यू टीमने ताब्यात घेतले आहे.**

हिंजवडी परिसरात ऊसतोडणी सुरू असल्याने बिबट्या आणि त्यांचे बछडे आढळण्याचे प्रकार घडत आहेत. नेरे (ता. मुळशी) येथील ऊसाच्या फडात शनिवारी नर जातीचा एक नवजात बछडा आढळून आला. राहुल जाधव यांच्या शेतात ऊसतोड करताना एका मजुराला हा बछडा आढळला. जाधव यांनी तत्काळ वनविभाला ही माहिती दिली त्यानुसार घटनास्थळी पौडचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष चव्हाण, वनपाल प्रज्ञा बनसोडे, आयटी पार्क हिंजवडीचे वनरक्षक पांडुरंग कोपनर, ॲनिमल रेस्क्यू टीम, वाईल्ड ॲनिमल अँड स्नेक प्रोटेक्शन, वन्यजीव रक्षक संघटेनेचे स्वयंसेवक दाखल झाले.

गोंधळामुळे घाबरून बिबट मादी बछड्याला घ्यायला आली नसावी, असा अंदाज वनरक्षक कोपनर यांनी व्यक्त केला. मात्र, त्या बछड्याला मातेची गरज असल्याने बछडा ज्या ठिकाणी सापडला त्याच ठिकाणी सायंकाळी त्याला सोडण्यात आले आणि कॅमेरे लावून त्यांची निरीक्षणे नोंदविली जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरू नये, असे आवाहन पौडचे वनपरिक्षेत्र अधिकारी चव्हाण यांनी केले आहे.

पिलांना हाताळताना कमालीची खबरदारी जोपर्यंत मादी बछड्याला घेऊन जात नाही तोपर्यंत दोन-तीन दिवस ऊसतोड बंद ठेवण्याच्या सूचना वन विभागाने शेतकरी जाधव यांना दिल्या आहेत. तसेच, बछड्याला मानवाचा हात लागला आणि त्याचा वास मादीला आल्यास ती त्यांना स्वीकारत नाही अशी माहिती वन अधिकाऱ्यांनी दिल्यानं पिलांना हाताळताना कमालीची खबरदारी घेण्यात आली. हातात कापडी व रबरी हँड ग्लोज घालूनच त्यांना पिंजऱ्यात ठेवण्यात आलं.

> **नेरे भागात मोठे ऊस क्षेत्र आहे. बिबट्याला लपण्यासाठी व खाद्यासाठी हे पोषक वातावरण असल्याने बिबट्याचा वावर वाढला आहे. मात्र, अद्याप मनुष्यावर हल्ल्याची घटना घडली नाही. परंतु ग्रामस्थांनी काळजी घेऊनच दैनंदिन कामकाज करावे. बिबट्या दिसल्यास काय खबरदारी घ्यावी याबाबत चित्रफीत, भारुड, पथनाट्ये, माहिती शिबिरे, माहिती पत्रके आणि ध्वनिक्षेपकाद्वारे आम्ही जनजागृती करत आहोत. वस्त्यांवरील घरा-घरात जाऊन पाळीव प्राणी व जेष्ठांची कशी घ्यावी याची माहिती दिली आहे.**
> **- - संतोष चव्हाण, वन परिक्षेत्र अधिकारी, पौड**

# फरार गुन्हेगारास सापळा रचून पिस्टलसह पकडले; खंडणी विरोधी पथकाची कारवाई



। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

वाकड पोलीस स्टेशन हद्दीतील गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला पोलिसांनी आज सापळा रचून पकडले आहे. या आरोपीकडून एक पिस्टल व दोन राउंड देखील ताब्यात घेण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने ही कारवाई केली आहे. अमोल जोतीराम घाडगे (वय-३४ वर्षे रा. कदमवस्ती, कोंडबावी, पो. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गुन्हे विभागाचे पोलीस उप आयुक्त संदिप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये कोणताही अनुचीत प्रकार घडू नये याकरीता फरारी व तडीपार आरोपी तसेच संशयीतांची तपासणी मोहिम सुरू आहे. गुन्हे शाखांच्या सर्व अधिकाऱ्यांना सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याच्या सुचना पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिलेल्या आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेकडील खंडणी विरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सुनिल भदाणे, सहा. पोलीस फौजदार रमेश गायकवाड, पोलीस हवालदार गणेश गिरीगोसावी व विजय नलगे यांना वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्यात फरार असलेला आरोपी अमोल जोतीराम घाडगे याच्याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर खंडणी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचून, अमोल घाडगे याला ताब्यात घेवुन, अटक केली.

# उलटतपासणी करायला हरकत काय?




**काही गोष्टी मनात घर करून राहतात. त्यातलंच हे एक टिपण, मनाला सुखवणारं. पंजू गांगुली यांनी लिहिलेलं. 'देवांची तपासणी आणि डॉ. खान नावाची एक मुस्लिम देवता' या नावाचं हृदयस्पर्शी टिपण. हे आहे छत्तीसगडच्या बस्तर जिल्ह्यातील शेकडो आदिवासी समुदायांच्यात रूढ असलेल्या दोन सोहळ्यांचं.**

त्यातून व्यक्त होणारी न्यारी धार्मिकता धर्माच्या आणि जातीच्या पलीकडे घेऊन जाणारी आहे. आणि खुद्द देवांचे मूल्यमापन करणारी जाणीव त्यातून दिसते. या दोन सोहळ्यांची गोष्ट मला उद्बोधक वाटली. साक्षात्कार व्हावा तसं जाणवलं की यांच्यात आपलं जग उजळून टाकण्याची क्षमता आहे.तर कथा अशी आहे: बस्तर जिल्ह्यातील विविध आदिवासी समुदायांमध्ये बंगारामदेवीला एक प्रमुख देवता मानण्यात येते. वर्षातून एकदा तिच्या स्थानी 'भादो जत्रा' नावाचा उत्सव भरतो. त्या दिवशी, २४० हून अधिक गावांतले आदिवासी समुदाय त्यांच्या त्यांच्या देवांना सोबत घेऊन बंगारामदेवीच्या पायापाशी आणतात. बंगारामदेवीच्या उपस्थितीत पुजारी या देवांची परीक्षा घेतात. देवांनी वर्षभरात आपल्या भक्तांच्या बरोबर केलेला व्यवहार तपासला जातो. देवांनी त्यांच्या समस्या सोडवल्या नाहीत आणि त्यांचं निराकरण केलेलं नाही असं आढळलं तर दैवी शक्तीच्या परीक्षेत नापास झालेल्या देवांचं देवत्व हिरावून घेतलं जातं. ते लाकडाचे आणि दगडाचे



निव्वळ पुतळे ठरतात. या नापास देवांच्या मूर्ती मग बंगारामदेवीच्या मंदिराच्या मागल्या अंगणात नेल्या जातात आणि कोपऱ्यातल्या एका ढिगाऱ्यावर टाकून दिल्या जातात. देवत्व हरण झालेल्या त्या मूर्ती वाऱ्याचा, पावसाचा, थंडीचा आणि सूर्याच्या प्रखर उन्हाचा तडाखा सहन करत इथेतिथे पडून राहतात. त्यातले काही देव कागदाच्या कपट्यासारखे झुडुपांमध्ये अडकलेले सापडतात. काही दगड गोट्यात जुन्या झाडांच्या बुंध्यांना टेकलेले आढळतात. दुसऱ्या सोहळ्याची एक वेगळीच मनोरंजक गोष्ट आहे: बस्तरच्या केशकल टेकडीच्या शिखरावर, एक लहान मंदिर आहे. तिथे एक मातीच्या गिलाव्याचा चौथरा आहे. या चौथऱ्यावर शिवलिंगासाख्या आकाराच्या काळ्या लाकडी तुकड्याची स्थापना करण्यात आली आहे. त्या शिवलिंगसदृश तुकड्याच्या बाजूला एक मातीचा दिवा लावलेला असतो. या ठिकाणी भरणाऱ्या 'सुरडोंगर' जत्रेच्या वेळी मंदिराचे दरवाजे उघडले जातात आणि आसपासच्या जमातींमधले हजारो लोक या देवांचं दर्शन घेण्यासाठी येतात. असंही मानलं जातं या देवाच्या पायाशी नतमस्तक होण्यासाठी, इतर देवही येतात. या देवाचं नाव आहे – डॉ. खान. सुमारे २०० वर्षांपूर्वी, जेव्हा बस्तरमध्ये कॉलरा आणि देवीसारख्या संसर्गजन्य रोगांच्या साथी फैलावल्या होत्या तेव्हा डॉ. खान नावाचे एक मुस्लिम डॉक्टर इथे आले आणि त्यांनी अनेक लोकांना मृत्यूच्या तावडीतून वाचवलं. साथ ओसरल्यावर डॉ. खान तिथेच राहिले आणि त्यांनी परिसरातील जनतेची सेवा केली. त्यांच्या मृत्यूनंतर, स्थानिक आदिवासींनी त्यांना देवपण बहाल केलं आणि या डॉ. खान देवाची पूजा सुरू झाली. अशा एकच नव्हे तर कितीतरी गोष्टी इथे आपल्याकडे आढळतात. आपल्याच देशात, आपल्याच भूमीत.पण आपण आपल्या देवांचं मूल्यमापन करू शकतो, करावं अशी जाणीव तरी आपल्यात आहे का? देवांचं सोडा, आपणच मतदान करून निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचंदेखील मूल्यमापन आपण करत नाही. त्यांना पास वा नापास ठरवणं तर दूरच राहिलं. अशा परिस्थितीत आपल्या समस्या त्यांच्याकडून सोडवल्या जातील अशी अपेक्षा तरी आपण कशी काय करू शकतो? आदिवासी समुदाय हे मुळात आपणा सर्व मनुष्यमात्रांचे पृथ्वीवरील शेष पूर्वज आहेत. त्यांच्यामध्ये आजदेखील देवांची परीक्षा घेऊन, नापास झलेल्या देवांना टाकून देण्याची जाणीव आहे. पण त्याच आदिवासींचे वंशज असलेले आपण मात्र अंधश्रद्धाळू झालो आहोत. आपली आपल्या मूळ आदिवासी पूर्वजांशी जोडणारी मुळं आपणच तोडून टाकलेली आहेत. समुदाय म्हणून आपण आपली जागरूकता हरवून बसलो आहोत. त्यामुळे पूर्वजांच्या आजही प्रस्तुत असणाऱ्या उत्तम पद्धती जतन करण्यात, वृद्धिंगत करण्यात आपण अयशस्वी ठरलो आहोत.निदान आता तरी आपण जागरूक झालं पाहिजे. सजग होऊन मतदारांच्या पायावर घालून आपल्या विद्यमान लोकप्रतिनिधींचं मूल्यमापन लोकशाहीच्या पुजाऱ्यांनी करायला हवं.

## संपादकीय »

### अभिजाताची जात

***गाणे संपल्यानंतरही सुरांची रुंजी काना-मनांत गुंजत राहावी, यासारखे सुख नाही.***

त्याउलट, एखाद्या वादाचा कोलाहल शमतो तेव्हा त्या वादातून उरलेल्या प्रश्नांची जाणीव पराकोटीची अस्वस्थता देते. कर्नाटक संगीतात नवनवे प्रयोग करणारे गायक टी. एम. कृष्णा यांना या क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा 'संगीत कलानिधी पुरस्कार' मिळाल्यानंतरचा वाद हा दोन्हीची आठवण देणारा आहे. तो वाद आता संपला, असेही म्हणता येते. कारण मुळात हा वाद ज्यांच्या पत्रामुळे घडला, त्या रंजनी-गायत्री या कर्नाटक शास्त्रीय गायिकांनी आता 'हा पुरस्कार देणाऱ्या संगीत महोत्सवाला आमची हजेरीअसल्याचा खुलासा केला आहे. हा पुरस्कार देणाऱ्या मद्रास म्युझिक अकॅडमीचे अध्यक्ष एन. मुरली यांनी ठाम राहून, आमची निवड कायम असल्याचे म्हटले आहे. एकेका संस्थांचे चिरे ढासळत असताना चेन्नईतली महत्त्वाची संगीत संस्था अविचल राहाते, याचे कौतुक आहेच. कोण रंजनी-गायत्री, इतकेच काय पण कोण टी. एम. कृष्णा आणि संगीत कलानिधी पुरस्काराचे काय एवढे महत्त्व हे माहीत नसणे स्वाभाविक.

या लेखातील मांडणी मुख्यत्वे आपला भारतीय समाज नजरेसमोर ठेवून केलेली आहे. याला वैश्विक वा अखिल मानवजातीस लागू पडेल असं परिमाण आहेच, परंतु पूर्णतः तसं पाहण्यात अनेक वेगळ्या संदर्भ अन बारकाव्यांची भर घालावी लागेल. या विचाराच्या केंद्रस्थानी आहे ती एक शंका.

# समाज माध्यमे काळाच्या पुढे आहेत

भवतालातल्या बदलत्या नितीमूल्यांच्या कल्पनांविषयीची. नेमकेपणानं बोट ठेवता येत नसलं तरी काहीतरी बदलत चाललंय, अन तेही अयोग्यरित्या अशी एक जाणीव. नेमकं काय होतंय? ऱ्हास होतोय? अध:पतन होतंय? नैतिकतेचं, नैतिक मूल्यांचं? असं असेल तर नेमकी कुणाची नैतिकता ढासळतेय?असं वाटतं अन जाणवतंय की आमचा एकमेकांवरचा, म्हणजे माणसाचा माणसावरचा विश्वास कमी होतोय. नीरक्षीरविवेक वा योग्यायोग्य ठरवण्याची आमची सारासार क्षमता लय पावत चाललीये. आणि यामुळे आम्ही फिरुन आदिम प्रेरणांच्या अंमलाखाली येत चाललो आहोत. साहजिकच, सारं काही 'माझ्या उपयोगी आहे वा नाही' केवळ या निकषावर तोलू पाहिलं जातंय; हिरेमाणकं हातात असली तरी खाण्यायोग्य नसल्यानं एखादं मर्कट ती भिरकावून देईल तसं. याची परिणती एकमेकांमधील संबंध बिघडत भीती, द्वेष आणि हिंसकपणा वाढण्यात



होत जातेय. यातील हिंसकपणा हा वैचारिक आणि शारीरिक अश्या दोन्ही पातळ्यांवर अनुभवास येतोय. आपण फिरून, तथाकथित आधुनिक जगात वावरणारे, आदिवासी होत चाललोय. काय होतंय नेमकं? कधी आणि कसं सुरु झालं असावं? उत्तरं शोधत मागं जाउयात थोडं. उदाहरणादाखल, एक साधंसं मध्यमवर्गीय कुटुंब... नातवापासून ते आजीआजोबा अशी सारी मंडळी एकत्र बसून ब्लॅक अँड व्हाईट टीव्हीवर दूरदर्शनची कुठलीशी कुटुंबवत्सल मालिका पाहण्यात रंगून गेलेत आणि हे संपलं की नंतर जेवणं होणारेत. असं सारं चालू असताना एके दिवशी अचानक एकाचे शंभर चॅनल झाले आणि इतकंच नव्हे तर सारं कुटुंब एकत्र पाहात असलेल्या कौटुंबिक कार्यक्रमात आता अचानक काहीबाही अश्लीलही दिसू लागलं. आम्ही लाजलो, बावचळलो, गोंधळलो, अर्धवट प्रतिक्रिया देऊ लागलो. लपवू लागलो. नैतिकतेच्या कल्पना तडकल्या, तिची शकलं झाली. आता साऱ्या कुटुंबासमवेत काही बघायची धास्ती वाटू लागली. कारण समोर काय दिसेल नि काय नाही याचा काय नेम? बरं पाहायला तर आवडतंय पण सांगण्याची चोरी, त्यामुळे चोरून पाहण्याची उर्मी वाढू लागली. म्हणजे एकट्याने वा मित्रांसोबत बिनदिक्कत, बिनाशरम करताना जे आनंद देणारं असं ते, कुटुंबियांसमोर वा समाजासमोर करताना मात्र अनैतिक ठरू लागलं. नैतिकतेच्या सोयीस्कर व्याख्या करणं भाग पडलं. सरसकट नैतिक वा अनैतिक असं काही नाही किंवा आपली अन त्यांची व्याख्या वेगळी आणि आपली ती योग्य अन त्यांची मात्र अयोग्य अश्या धारणा मूळ धरु लागल्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# म्हणून मी बारामतीमधून माघार घेतोय!

## नेत्यांना न ऐकणारे शिवतारे ओएसडींच्या फोनमुळे नरमले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांच्याविरोधात बारामतीमध्ये बंड पुकारणाऱ्या विजय शिवतारेंनी अखेर माघार घेत आपले बंड शमल्याचे जाहीर केले. दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह विजय शिवतारेंचा एक फोटो प्रसिद्ध झाला होता. त्यावरून विजय शिवतारे निवडणुकीचा हट्ट सोडणार, हे निश्चित झाल्याचे बोलले जात होते.**



आज पुरंदर येथे पत्रकार परिषद घेऊन विजय शिवतारे यांनी बंड पुकारण्यापासून ते माघार घेईपर्यंतचा सर्व घटनाक्रम सविस्तर सांगितला. शिवतारेंच्या नरमाईमुळे आता महायुतीमधील मोठा तिढा सुटला आहे. तसेच महायुतीच्या अद्याप जाहीर न झालेल्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासमोरील अडचणींचा डोंगर कमी झाल्याचे बोलले जात आहे.विजय शिवतारे यांनी निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना मुंबईत चर्चेसाठी बोलावले होते. पण त्यांच्या भेटीनंतर विजय शिवतारे अधिक आक्रमक झालेले पाहायला मिळाले. त्यामुळे महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र नेत्यांना न ऐकणारे शिवतारे मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या फोनवरून नरमले. याबद्दलचा किस्सा त्यांनी स्वतः आज पत्रकार परिषदेत सांगितला. शिवतारे म्हणाले, "२६ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांचे खतगावकर नावाच्या ओएसडींचा मला फोन आला. त्यांनी माझी समजूत काढली. माझ्या भूमिकेमुळे मुख्यमंत्री आणि महायुतीमध्ये अडचण होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक मतदारसंघात असे अपक्ष उमेदवार उभे राहिले तर महायुतीसमोर अडचण उभी राहिल. ज्यामुळे महायुतीचे खासदार पडू शकतात. मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या फोनमुळे मी माझा विचार बदलला.""या फोननंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह २७ मार्च रोजी रात्री ११ ते २ अशी तीन तास चर्चा झाली", असे शिवतारे म्हणाले. मागच्या पाच वर्षात मला अनेक अडचणींचा सामना करावा लागला, हे मी त्यांच्या कानावर घातले. माझ्या ज्या प्रमुख मागण्या होत्या, त्यापैकी गुंजवणी धरणाचे पाणी पुरंदरला देण्याचे मान्य करण्यात आले आहे. आचारसंहितेमध्ये या योजनेचे पेपरवर्क पूर्ण करून आचारसंहिता संपल्यानंतर कामाचे निर्देश देण्यात येतील, अशी माहिती शिवतारे यांनी दिली.पुरंदरमध्ये संपूर्ण शिवसेनेची सर्व आणि एकूण दीड लाख मते महायुतीचा उमेदवाराला म्हणजे घड्याळाला गेली पाहीजेत, असे स्पष्ट आदेश मी माझ्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा सत्तारूढ करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने काम करू, असा विश्वास शिवतारे यांनी व्यक्त केला. यावेळी बोलत असताना शिवतारे म्हणाले की, याआधी दादांच्या (अजित पवार) हातून काही चूका झाल्या असतील, पण मोठे ईप्सित गाठण्यासाठी आम्ही सर्व एकत्र आलो आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करण्याचा ठराव आम्ही केला आहे. कार्यकर्त्यांमध्ये मनोमिलन करण्यासाठी अजित पवार स्वतः पुरंदरमध्ये येणार असल्याचा शब्द त्यांनी दिला आहे. राजकारणामध्ये कुणीच कुणाचा कायमचा शत्रू नसतो आणि मित्रही नसतो. या सूत्रानुसार आम्ही मागच्या सर्व गोष्टी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवाराला बहुमत निवडूण आणणार आहोत, असेही ते म्हणाले. विजय शिवतारे यांनी बंड पुकारण्यापासून ते माघार घेईपर्यंतचा सर्व घटनाक्रम सविस्तर सांगितला. शिवतारेंच्या नरमाईमुळे आता महायुतीमधील मोठा तिढा सुटला आहे.

### ओएसडीमुळे विचार बदलला

» .विजय शिवतारे यांनी निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना मुंबईत चर्चेसाठी बोलावले होते. पण त्यांच्या भेटीनंतर विजय शिवतारे अधिक आक्रमक झालेले पाहायला मिळाले. त्यामुळे महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र नेत्यांना न ऐकणारे शिवतारे मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या फोनवरून नरमले. याबद्दलचा किस्सा त्यांनी स्वतः आज पत्रकार परिषदेत सांगितला. शिवतारे म्हणाले, "२६ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांचे खतगावकर नावाच्या ओएसडींचा मला फोन आला. त्यांनी माझी समजूत काढली. माझ्या भूमिकेमुळे मुख्यमंत्री आणि महायुतीमध्ये अडचण होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक मतदारसंघात असे अपक्ष उमेदवार उभे राहिले तर महायुतीसमोर अडचण उभी राहिल. ज्यामुळे महायुतीचे खासदार पडू शकतात. मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या फोनमुळे मी माझा विचार बदलला.""या फोननंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह २७ मार्च रोजी रात्री ११ ते २ अशी तीन तास चर्चा झाली", असे शिवतारे म्हणाले. मागच्या पाच वर्षात मला अनेक अडचणींचा सामना करावा लागला, हे मी त्यांच्या कानावर घातले.

# घराणेशाहीला पूर्णविराम; सोलापूरमध्ये भाजपाचा 'राम'

## लोकसभा निवडणूक : राम सातपुते यांच्या प्रचाराला सर्वसामान्यांचा प्रतिसाद

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर लोकसभा मतदार संघात घराणेशाहीला थारा न देता सर्वसामान्य कुटुंबातील सर्वसामान्य लोकांचे प्रश्न समजून घेणारा खासदार निवडून द्यायाचा, असा निर्धार भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे 'घराणेशाहीला पूर्णविराम; सोलापूरमध्ये भाजपाचा जय श्री'राम'' असा नारा सुरू आहे.**



परिणामी, कॉंग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे 'बॅक फूट'वर आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांच्यात लढत होणार आहे. कॉंग्रेस आणि भाजपने अधिकृतपणे आपापल्या पक्षाकडून सातपुते आणि शिंदे यांची नावे जाहीर केली आहेत. उमेदवारी जाहीर होताच दोन्ही उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली आहे.

कॉंग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे १९७४ पासून राजकीय क्षेत्रात आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सोलापूरचे खासदार अशी मोठी पदे भूषवली असतानाही सोलापूरचा विकास झाला नाही, अशी जनभावना आहे.

त्यानंतर शिंदे यांनी आपली कन्या प्रणिती यांना आमदार केले. महाराष्ट्राच्या सभागृहात पाठवले. त्यांच्याकाळातही गेल्या ५० वर्षांपासून प्रलंबित प्रश्न सुटलेले नाहीत. त्यामुळे कॉंग्रेस आणि शिंदे यांच्याप्रति सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्याचा फायदा राम सातपुते यांना होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### 'भगवा दहशतवाद...'' मुद्दा गाजणार...

» हिंदूंना दहशतवादी आणि भगवा आतंकवाद म्हणणं हा यांचा खरा चेहरा असून, भगवा दहशतवाद म्हणणारे लोक आता भगवे वस्त्र परिधान करणाऱ्या आमच्या संतांचे दर्शन घेत आहेत. पण इथले हिंदू त्यांचा खरा चेहरा जाणून आहेत. त्यामुळे आगामी काळात ते पूर्ण ताकदीने आमच्यासोबत असतील, असा दावा राम सातपुते यांनी केला आहे. त्यामुळे सोलापूरमध्ये राजकीय प्रचार जोर धरु लागला असून, राम सातपुते यांनी आघाडी घेतल्याचे पहायला मिळत आहे.


# 75 भारतीयांची कंबोडियातून सुटका!

## नागरिकांकडून बळजबरीने गुन्हे करवून घेतले जात आहेत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कंबोडिया देशात भारतीयांकडून बळजबरीने साबयर गुन्हे करून घेतले जात असल्याच्या १३० तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मोठी खळबळ उडाली. सरकारने भारतीय नागरिकांना सोडविण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यानंतर कंबोडियाची राजधानी नोम पेन्ह शहरातील भारतीय दूतावासाने ७५ भारतीयांची सुटका केली आहे. दूतावासाचे द्वितीय सचिव अवरान अब्राहम यांनी ही माहिती दिली.**



कंबोडियात जवळपास ५००० भारतीय नागरिकांकडून बळजबरीने सायबर गुन्हे करवून घेतले जात आहेत, अशी माहिती द इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने दिली होती. सरकारच्या अंदाजानुसार, मागील सहा महिन्यात या सायबर गुन्हेगारीतून सुमारे ५०० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कंबोडियामध्ये अडकलेले नागरिकांकडून भारतीय लोकांनाच लुटण्याचे काम केले जाते. शासकीय अधिकारी असल्याची बतावणी करून लोकांकडून पैसे उकळण्याचे काम या लोकांकडून करून घेतले जाते.या महिन्याच्या सुरुवातीला केंद्रीय गृह मंत्रालयाने परराष्ट्र मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर सुरक्षा तज्ज्ञांची बैठक बोलावून कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी धोरण निश्चित केले होते. अब्राहम यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, कंबोडियाच्या विविध भागातून दररोज चार ते पाच तक्रारी फोनद्वारे येत आहेत. या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आम्ही तात्काळ पोलिसांना याची माहिती देतो. तसेच या लोकांनी दूतावासापर्यंत कसे पोहोचावे, याचे मार्गदर्शन करत आहोत. अनेक लोक मानसिक धक्क्यात असल्यामुळे त्यांना समुपदेशन देण्याचेही काम आम्ही करत आहोत. अब्राहम पुढे म्हणाले की, जेव्हा कंबोडियात अडकलेल्या लोकांची सुटका केली जाते, तेव्हा ते भारतात जाऊन एफआयआर दाखल करत नाहीत, ही एक मोठी अडचण आहे. जर त्यांनी एफआयआर दाखल केले तर भारतीय पोलीस एजंट आणि कंपन्यांपर्यंत पोहोचू शकतात. आम्ही केंद्रीय गृहखात्याच्या संपर्कात आहोत. आम्हाला जेव्हा जेव्हा एखाद्या एजंटची माहिती मिळते, तेव्हा आम्ही ती भारताला देतो. जर सुटका झालेल्या लोकांनी एफआयआर दाखल करण्यास सुरुवात केली, तरच पोलीस या प्रकरणाच्या मुळाशी जाऊ शकतील, असेही अब्राहम म्हणाले. भारतीय नागरिक कंबोडियाच्या सायबर गुन्हेगारीच्या चक्रात कसे फसतात, याबद्दल माहिती दिली आहे. कंबोडियात डेटा एंट्रीची नोकरी आहे, असे समजून अनेक लोक इथे येतात. पण एजंटकडून त्यांची दिशाभूल झाल्याचे समजल्यानंतर आपण इथे येऊन एका जाळ्यात अडकलो असल्याचे लक्षात येते. तरीही अनेकजण या जाळ्यातून तात्काळ बाहेर पडू शकत नाहीत. बहुतेक लोक गरीब पार्श्वभूमीतून आलेले असतात. त्यांच्यापैकी काहींनी एजंटना नोकरीसाठी मोठी रक्कम दिलेली असते. ही रक्कम इथे राहून ते कशीतरी वसूल करतील आणि नंतर बाहेर पडतील, असा विचार अेक लोक करतात. कंबोडियात जवळपास ५००० भारतीय नागरिकांकडून बळजबरीने सायबर गुन्हे करवून घेतले जात आहेत, अशी माहिती द इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने दिली होती. सरकारच्या अंदाजानुसार, मागील सहा महिन्यात या सायबर गुन्हेगारीतून सुमारे ५०० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

### एफआयआर दाखल केले

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कंबोडियामध्ये अडकलेले नागरिकांकडून भारतीय लोकांनाच लुटण्याचे काम केले जाते. शासकीय अधिकारी असल्याची बतावणी करून लोकांकडून पैसे उकळण्याचे काम या लोकांकडून करून घेतले जाते.या महिन्याच्या सुरुवातीला केंद्रीय गृह मंत्रालयाने परराष्ट्र मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर सुरक्षा तज्ज्ञांची बैठक बोलावून कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी धोरण निश्चित केले होते. अब्राहम यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, कंबोडियाच्या विविध भागातून दररोज चार ते पाच तक्रारी फोनद्वारे येत आहेत. या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आम्ही तात्काळ पोलिसांना याची माहिती देतो. अब्राहम पुढे म्हणाले की, जेव्हा कंबोडियात अडकलेल्या लोकांची सुटका केली जाते, तेव्हा ते भारतात जाऊन एफआयआर दाखल करत नाहीत, ही एक मोठी अडचण आहे. जर त्यांनी एफआयआर दाखल केले तर भारतीय पोलीस एजंट आणि कंपन्यांपर्यंत पोहोचू शकतात.आम्ही केंद्रीय गृहखात्याच्या संपर्कात आहोत. आम्हाला जेव्हा जेव्हा एखाद्या एजंटची माहिती मिळते तेव्हा आम्ही ती भारताला देतो.

# आम आदमी पार्टीला आणखी एक धक्का?

## मद्य धोरण प्रकरणात आणखी एक मंत्री ईडीसमोर हजर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील अबकारी धोरण प्रकरणत कथित मद्य घोटाळा झाल्याचा आरोप करत ईडीने वर्षभरापूर्वी माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदीया यांना अटक केली. त्यानंतर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अटक केली आहे. या कारवाईला एक आठवडा उलटला आणि लगेच आम आदमी पक्षाचे आणखी एक मंत्र्याला ईडीने समन्स बजावले आहे.**

दिल्लीचे मंत्री कैलाश गहलोत यांना ईडीने शनिवारी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले. ४९ वर्षीय कैलाश गहलोत हे दिल्लीच्या नजफगड मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आहेत. दिल्ली सरकारमध्ये त्यांच्याकडे वाहतूक, गृह आणि विधी या खात्याची जबाबदारी आहे.मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अटक करण्यात आली. स्वतंत्र भारतात पहिल्यांदाच एखाद्या पदावर असलेल्या मुख्यमंत्र्याला अटक करण्यात आली आहे. १ एप्रिलपर्यंत केजरीवाल यांना ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे.आम आदमी पक्ष सरकारने २०२१ मध्ये दिल्लीसाठी नवे मद्यधोरण आणले. मद्यपानासाठी विधिसंमत वय २५ वरून २१ इतके करणे, शासनमान्य



मद्य दुकानांना बंदी आणि खासगी व्यावसायिकांना दुकानांचे परवाने, विविध प्रकारच्या मद्यांसाठी स्वतंत्र नोंदणी, दिल्लीबाहेर होणाऱ्या मद्यविक्री किमतींवर नियंत्रण आदी बाबींमध्ये बदल करण्यात आला. दिल्ली प्रशासनाकडून निविदेद्वारे ८४९ खासगी मद्यविक्रेत्यांना परवाने जारी करण्यात आले. मद्यविक्री परवाना शुल्कात आठ लाखांवरून ७५ लाख रुपये इतकी वाढ आदींचा यात समावेश होता. त्यामुळे दिल्लीतील मद्यमाफियांची मक्तेदारी संपुष्टात येईल आणि दिल्ली शासनाच्या महसुलात वाढ होईल, असा दावा करण्यात आला होता. दिल्लीत पहिल्यांदाच अशा रीतीने खासगी मद्यविक्रेत्यांचा शिरकाव झाला होता. मद्यधोरण घोटाळ्यात दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया, संजय सिंग, विजय नायर हे आपचे नेते तुरुंगात आहेत. आप शासनाला १०० कोटींची लाच दिल्याच्या आरोपावरून भारत राष्ट्र समितीच्या नेत्या आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांनाही अटक झाली आहे.

### कैलाश गहलोत यांनाही समन्स

त्यानंतर आता कैलाश गहलोत यांनाही समन्स बजावल्यामुळे त्यांनाही तुरुंगात टाकले जाणार का? असा प्रश्न 'आप' कार्यकर्त्यांना पडला आहे.दिल्लीतील अबकारी धोरण प्रकरणत कथित मद्य घोटाळा झाल्याचा आरोप करत ईडीने वर्षभरापूर्वी माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदीया यांना अटक केली. त्यानंतर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अटक केली आहे. या कारवाईला एक आठवडा उलटला आणि लगेच आम आदमी पक्षाचे आणखी एक मंत्र्याला ईडीने समन्स बजावले आहे. दिल्लीचे मंत्री कैलाश गहलोत यांना ईडीने शनिवारी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले.

# अक्षयशी ब्रेकअप झाल्यावर केलेला आत्महत्येचा प्रयत्न?

रवीना टंडन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. ती सध्या तिच्या 'पटना शुक्ला' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती वकिलाची भूमिका साकारत आहे. रवीना तिच्या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करत आहे. प्रमोशनदरम्यान, रवीनाने अक्षय कुमारसोबतच्या ब्रेकअपबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. तसेच नातं तुटल्यानंतर तिने आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या वृत्तावरही अभिनेत्रीने मौन सोडलं आहे. रवीना टंडन २० वर्षांहून अधिक काळानंतर अक्षय कुमारबरोबर स्क्रीन शेअर करणार आहे. 'वेलकम टू जंगल' या चित्रपटात दोघेही एकत्र काम करत आहेत. "खूप सारी नाती तुटतात आणि लोक आयुष्यात पुढे जातात, पण मैत्री संपत नाही. कदाचित आपण जोडीदार म्हणून एकमेकांसाठी योग्य नव्हतो, असं लक्षात येतं. यात मोठं काय आहे? मला खरंच कळत नाही. मी ते नातं तुटलं तरी ठिक होते. पण मीडियाने खूप मोठा गोंधळ निर्माण केला कारण त्यांना त्यांची मॅगझिन विकायची होती," असं मोजो स्टोरीला दिलेल्या मुलाखतीत रवीना म्हणाली."माझ्यासाठी फक्त माझे कुटुंब आणि मित्र काय विचार करतात, ते महत्त्वाचं आहे. एकवेळ अशी येते जेव्हा लोक माझ्याबद्दल काय विचार करतात याचा मला फरक पडत नाही," असं रवीना म्हणाली. तसेच साखरपुडा मोडल्यानंतर तिने आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या अफवा पसरल्या होत्या. या अफवांचा तिला काहीच फरक पडत नसल्याचं ती म्हणाली. ज्या प्रकारच्या गोष्टी माझ्या आजूबाजूला बोलल्या जात होत्या, त्यावर माझं नियंत्रण नव्हतं.

# अरबाज खानच्या वडिलांसह दिसली मलायका अरोरा

अभिनेत्री मलायका अरोरा अरबाज खानपासून विभक्त झाल्यावर खान कुटुंबाबरोबर दिसत नाही. पण आता एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओत ती तिचा पूर्वाश्रमीचा पती अरबाजचे वडील सलीम खान यांच्याबरोबर दिसत आहे. यावेळी मलायकाबरोबर तिची आई जॉयसी अरोरादेखील होत्या. सलीम खान, मलायका अरोरा व जॉयसी अरोरा हे तिघेही एका हॉटेलमधून बाहेर पडताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाले. या हॉटेमध्ये पार्टी होती आणि अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी याठिकाणी आले होते. या हॉटेलमधून आधी सलीम खान बाहेर पडले, त्यापाठोपाठ मलायका व तिची आई बाहेर पडले. नंतर सलीम खान व जॉयसी एकाच कारने एकत्र गेले. विरल भयानी व इन्स्टंट बॉलीवूडने शेअर केलेले हे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.अरबाज व मलायका मुलगा अरहानबरोबर आधी एकत्र दिसायचे. पण अरबाजने शुरा खानशी दुसरं लग्न केलं, तेव्हापासून हे दोघेही पूर्वाश्रमीचे जोडीदार एकत्र दिसत नाही. अरहान बऱ्याचदा त्याच्या आईबरोबर दिसतो. तसेच खान कुटुंबाचा कार्यक्रम असेल तर तेव्हा तो त्याचे वडील व सावत्र आई शुरा यांच्याबरोबर कार्यक्रमाला हजेरी लावतो.अरबाज खान व मलायका यांनी १९९८ मध्ये प्रेम विवाह केला होता. १९ वर्षे संसार केल्यानंतर २०१७ मध्ये या जोडप्याने घटस्फोट घेतला. तेव्हापासून मलायका अभिनेता अर्जुन कपूरबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. तर, अरबाज आधी जॉर्जिया अँड्रियानीला डेट करत होता, पण त्यांचं ब्रेकअप झालं आणि काही काळाने त्याने रवीना टंडनची मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी डिसेंबर २०२३ मध्ये लग्न केलं.

# 'क्रू'ची दमदार सुरुवात

तब्बू, करीना कपूर व क्रिती सेनॉन या अभिनेत्री मुख्य भूमिकेत असलेला 'क्रू' चित्रपट शुक्रवारी (२९ मार्च रोजी) सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने ग्रँड ओपनिंग केली आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी जबरदस्त कमाई केली आहे. हा २०२४ मधील सर्वाधिक ओपनिंग करणाऱ्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे.प्रेक्षक 'क्रू' चित्रपटाच्या रिलीजची आतुरतेने वाट पाहत होते. कारण रिलीज होण्यापूर्वीच या चित्रपटाची खूप चर्चा होती. आधी चित्रपटाचा मनोरंज टीझर आला, त्यानंतर ट्रेलरने प्रेक्षकांची उत्कंठा वाढवली. या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच करीना, तब्बू व क्रिती एकत्र आल्या आहेत. या चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत.'सॅकनिल्क' च्या वृत्तानुसार, 'क्रू'ने पहिल्या दिवशी भारतात ८.७५ कोटी रुपये कमावले आहेत. तर जगभरात या चित्रपटाने २०.०७ कोटी रुपयांची कमाई केली आहे. शुक्रवार असूनही चित्रपटाने पहिल्या दिवशी चांगली कमाई केली आहे. वीकेंडला या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.'क्रू' चे दिग्दर्शन राजेश कृष्णन यांनी केले आहे आणि त्यात कपिल शर्मा, दिलजीत दोसांझ, सास्वता चॅटर्जी आणि राजेश शर्मा यांच्याही भूमिका आहेत. हा विनोदी चित्रपट पहिल्या दिवशी चांगली कमाई करण्यात यश्वी ठरला आहे. चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर अजय देवगणच्या 'शैतान'शी टक्कर होत आहे. पण या चित्रपटाला तीन आठवडे झाले आहेत. याशिवाय दुसरा कोणताही मोठा चित्रपट प्रदर्शित झालेला नाही, त्याचा फायदा या चित्रपटाला मिळू शकतो.



# चित्रपटासाठी वडिलांची मालमत्ता विकली

रणदीप हुड्डाची मुख्य भूमिका असलेला 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट गेल्या शुक्रवारी म्हणजेच २२ मार्च रोजी हिंदी व मराठी भाषेत प्रदर्शित झाला. एका आठवड्यात या चित्रपटाने ११ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाच्या निर्मितासाठी आपण जवळचे पैसे खर्च केले आहेत, असं रणदीपने सांगितलं. त्याच्या वडिलांनी त्याच्यासाठी घेतलेली मुंबईत प्रॉपर्टी विकून त्याने या चित्रपटाची निर्मिती केली, असं एका मुलाखतीत तो म्हणाला. 'बिअरबाइसेप्स' पॉडकास्टमध्ये रणदीप हुड्डाने हजेरी लावली. यावेळी त्याने या चित्रपटाच्या निर्मितीच्या प्रवासाबद्दल सांगितलं. हा चित्रपट जगभरात पाहिला जावा आणि निवडणुकीचं वर्ष असल्याने त्याला उजव्या विचारणीचा सिनेमा समजून दुर्लक्ष करू नये, अशी इच्छा त्याने व्यक्त केली. रणदीपने त्याला आलेल्या आर्थिक अडचणींबाबत या मुलाखतीत भाष्य केलं. तसेच चित्रपटात सावरकरांचे पात्र साकारण्यासाठी त्याने वजन खूप कमी केलं होतं. तर, इतकं वजन कमी केल्यावर आलेल्या अडचणींबद्दलही त्याने सांगितलं."मला हा चित्रपट गेल्या वर्षी १५ ऑगस्टला किंवा त्यानंतर २६ जानेवारीला प्रदर्शित करायचा होता. मी खूप मेहनत घेतली, पण तरीही तो पूर्ण होऊ शकला नाही. आम्हाला खूप अडचणी आल्या, कारण सुरुवातीला या चित्रपटाशी जोडलेल्या टीममधील लोकांचा दर्जेदार चित्रपट बनवण्याचा हेतू नव्हता. त्यांना फक्त चित्रपटाची निर्मिती करायची होती. आम्हाला आर्थिक अडचण आल्या. माझ्या वडिलांनी बचत करून माझ्यासाठी मुंबईत दोन-तीन प्रॉपर्टी विकत घेतल्या होत्या, मी त्या विकून आलेले पैसे चित्रपट निर्मितीसाठी वापरले. माझ्या या चित्रपटाला कोणाचाही पाठिंबा नव्हता," असं रणदीप म्हणाला.वीर सावरकर यांच्या भूमिकेसाठी वजन कमी करण्याचा अनुभव रणदीपने सांगितला. वजन ६० किलोपर्यंत कमी केलं होतं, पण ते वजन वाढू न देता तितकंच ठेवून नीट आहार न घेता चित्रपट दिग्दर्शित करणं हे मोठं आव्हान होतं. "मी फक्त पाणी, ब्लॅक कॉफी आणि ग्रीन टी पीत असेल. नंतर मी माझ्या आहारात डार्क चॉकलेट आणि नट्स आणि इतर पदार्थ समाविष्ट केले. माझ्या आहारामुळे माझी झोप कमी होऊ लागली होती.

# प्रियांका पोहोचली बहिणीच्या वाढदिवसाला

अभिनेत्री व 'बिग बॉस १७' ची फायनलिस्ट मनारा चोप्राचा शुक्रवारी (२९ मार्च रोजी) वाढदिवस होता. मनाराच्या ३३ व्या वाढदिवसाचं जोरदार सेलिब्रेशन करण्यात आलं. तिच्या वाढदिवसाच्या पार्टीला तिची बहीण प्रियांका चोप्रा व तिचा पती निक जोनस उपस्थित होते. प्रियांका ही मनाराची मामेबहीण आहे. मनाराच्या वाढदिवसाचं जंगी सेलिब्रेशन करण्यात आलं. लाल रंगाच्या वेस्टर्न ड्रेसमध्ये मनारा खूप सुंदर दिसत होती. तर बहिणीच्या वाढदिवसासाठी प्रियांकाने पांढऱ्या रंगाचा ड्रेस निवडला होता. निक जोनस ट्रान्सपरंट शर्ट व कॅज्युअल पँटमध्ये या सेलिब्रेशनसाठी पोहोचला. या तिघांनी एकत्र पोज दिल्या. यावेळी प्रियांका मस्ती करताना दिसली.सोशल मीडियावर मनारा, प्रियांका व निक यांचे व्हिडीओ व्हायरल होत आहे. या तिघांबरोबर चोप्रा कुटुंबियांनी देखील या पार्टीला हजेरी लावली. सर्वांनी मनाराचा वाढदिवस दणक्यात साजरा केला. मनाराची बहीण मितालीदेखील याठिकाणी उपस्थित होती. वरिंदर चावला, विरल भयानी या पापाराझी अकाउंट्सवरून व्हिडीओ शेअर करण्यात आले आहेत.निक व प्रियांका वेळ काढून वाढदिवसाच्या सेलिब्रेशनसाठी आले, त्याबद्दल मनाराने त्यांचे आभार मानले. "प्रियांका दिदी आणि निक जीजू दोघेही आलेत. घरातील सदस्य आले की वाढदिवस अजून खास होतो. त्यांनी त्यांच्या व्यग्र शेड्यूलमधून माझ्यासाठी वेळ काढला, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, सर्वांचे खूप खूप आभार," असं मनारा म्हणाली.प्रियांका व निक दोघेही दोन आठवड्यांपासून भारतात आहेत. आधी प्रियांका लेक मालतीला घेऊन भारतात आली, त्यानंतर दोन दिवसांनी निक भारतात आला. दोघांनी नोएडामध्ये कुटुंबाबरोबर होळी सेलिब्रेशन केलं. त्यानंतर आता ते मनाराच्या वाढदिवसासाठी मुंबईला आले.अभिनेत्री व 'बिग बॉस १७' ची फायनलिस्ट मनारा चोप्राचा शुक्रवारी (२९ मार्च रोजी) वाढदिवस होता. मनाराच्या ३३ व्या वाढदिवसाचं जोरदार सेलिब्रेशन करण्यात आलं. तिच्या वाढदिवसाच्या पार्टीला तिची बहीण प्रियांका चोप्रा व तिचा पती निक जोनस उपस्थित होते. प्रियांका ही मनाराची मामेबहीण आहे. मनाराच्या वाढदिवसाचं जंगी सेलिब्रेशन करण्यात आलं. लाल रंगाच्या वेस्टर्न ड्रेसमध्ये मनारा खूप सुंदर दिसत होती. तर बहिणीच्या वाढदिवसासाठी प्रियांकाने पांढऱ्या रंगाचा ड्रेस निवडला होता. निक जोनस ट्रान्सपरंट शर्ट व कॅज्युअल पँटमध्ये या सेलिब्रेशनसाठी पोहोचला. या तिघांनी एकत्र पोज दिल्या. यावेळी प्रियांका मस्ती करताना दिसली.सोशल मीडियावर मनारा, प्रियांका व निक यांचे व्हिडीओ व्हायरल होत आहे. या तिघांबरोबर चोप्रा कुटुंबियांनी देखील या पार्टीला हजेरी लावली. सर्वांनी मनाराचा वाढदिवस दणक्यात साजरा केला. मनाराची बहीण मितालीदेखील याठिकाणी उपस्थित होती. वरिंदर चावला, विरल भयानी या पापाराझी अकाउंट्सवरून व्हिडीओ शेअर करण्यात आले आहेत.निक व प्रियांका वेळ काढून वाढदिवसाच्या सेलिब्रेशनसाठी आले.



# विराट-गंभीरची गळाभेट नाटक?

## सुनील गावस्कर आणि रवी शास्त्री यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएलमधील केकेआर विरूद्ध आरसीबीचा सामना रंगणार म्हणजे विराट कोहली आणि गौतम गंभीर पुन्हा एकदा आमनेसामने येणार हे निश्चित. गेल्यावर्षीचा आयपीएलमधील वादाचा प्रसंग सर्वांनाच चांगला लक्षात होता. केकेआरविरूद्धच्या सामन्यात विराट कोहली मैदानावर प्रथम फलंदाजी करत होता तर केकेआरचा संघ गोलंदाजी करत होता. या सामन्यात स्ट्रॅटेजिक टाईम आऊटदरम्यान गंभीर कोहलीजवळ येताना दिसला, पण दोघांनी एकमेकांना मिठी मारल्याने सारेच आश्चर्यचकित झाले. यावर सुनील गावस्कर आणि रवी शास्त्री यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे.**



चिन्नास्वामीवरील सामन्यात टाइमआउटच्या वेळी गंभीर केकेआरच्या खेळाडूंशी संवाद साधत असतानाच तो कोहलीकडे गेला, जो पाणी पीत खेळाडूंसोबत चर्चाही करत होता. विराट गंभीर भेटताच त्यांनी आधी मिठी मारली आणि यानंतर दोघे हसत खेळत एकमेकांशी गप्पा मारताना दिसले. हा क्षण सोशल मीडियावर व्हायरल होत होता. ब्रॉडकास्टर्सनीही हा व्हीडिओ संपूर्ण सामन्यात अनेक वेळा दाखवला आणि त्यातील एका रिप्लेदरम्यान, शास्त्री यांनी प्रतिक्रिया दिली – "विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्यातील गळाभेटीसाठी केकेआरला फेअरप्ले पुरस्कार."रवी शास्त्रींसोबत समालोचन करत असलेले गावसकर म्हणाले – "फक्त फेअरप्ले पुरस्कार नाही तर ऑस्करदेखील दिला पाहिजे." गेल्या वर्षी लखनऊमध्ये झालेल्या भांडणानंतर कोहली आणि गंभीरने एकत्र दिसले. आयपीएलमधील केकेआर विरूद्ध आरसीबीचा सामना रंगणार म्हणजे विराट कोहली आणि गौतम गंभीर पुन्हा एकदा आमनेसामने येणार हे निश्चित. गेल्यावर्षीचा आयपीएलमधील वादाचा प्रसंग सर्वांनाच चांगला लक्षात होता. केकेआरविरूद्धच्या सामन्यात विराट कोहली मैदानावर प्रथम फलंदाजी करत होता तर केकेआरचा संघ गोलंदाजी करत होता. या सामन्यात स्ट्रॅटेजिक टाईम आऊटदरम्यान गंभीर कोहलीजवळ येताना दिसला, पण दोघांनी एकमेकांना मिठी मारल्याने सारेच आश्चर्यचकित झाले. यावर सुनील गावस्कर आणि रवी शास्त्री यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे. एलएसजीच्या नवीन-उल-हकसोबत कोहलीचा मैदानावर वाद झाला, त्यामुळे पंचांना हस्तक्षेप करावा लागला. सामना संपल्यानंतर दोघांनी एकमेकांना हस्तांदोलन केले. काही क्षणांनंतर कोहली आणि गंभीर एकमेकांवर आरोप करताना दिसले. ज्यामुळे मोठा गोंधळ पाहायला मिळाला होता. २०१३ मधील आयपीएल सामन्यादरम्यान पहिल्यांदाच त्यांच्यात वाद झाला होता. २०१६ मध्ये या दोघांमध्ये आणखी एक वाद पाहायला मिळाला. ७ वर्षांनंतर लखनऊमध्ये गेल्या मोसमात सामन्यानंतर एकमेकांसोबत भिडताना दिसले होते.चिन्नास्वामीवरील सामन्यात टाइमआउटच्या वेळी गंभीर केकेआरच्या खेळाडूंशी संवाद साधत असतानाच तो कोहलीकडे गेला, जो पाणी पीत खेळाडूंसोबत चर्चाही करत होता. विराट गंभीर भेटताच त्यांनी आधी मिठी मारली आणि यानंतर दोघे हसत खेळत एकमेकांशी गप्पा मारताना दिसले. हा क्षण सोशल मीडियावर व्हायरल होत होता. ब्रॉडकास्टर्सनीही हा व्हीडिओ संपूर्ण सामन्यात अनेक वेळा दाखवला आणि त्यातील एका रिप्लेदरम्यान, शास्त्री यांनी प्रतिक्रिया दिली – "कोहली आणि गंभीर यांच्यातील गळाभेटीसाठी केकेआरला फेअरप्ले पुरस्कार. शास्त्रींसोबत समालोचन करत असलेले गावसकर म्हणाले – केकेआरविरूद्धच्या सामन्यात विराट कोहली मैदानावर प्रथम फलंदाजीसंघ गोलंदाजी करत होता. या सामन्यात स्ट्रॅटेजिक टाईम आऊटदरम्यान गंभीर कोहलीजवळ येताना दिसला, पण दोघांनी एकमेकांना मिठी मारल्याने सारेच आश्चर्यचकित झाले.

### सारेच झाले आश्चर्यचकित

"रवी शास्त्रींसोबत समालोचन करत असलेले गावसकर म्हणाले – "फक्त फेअरप्ले पुरस्कार नाही तर ऑस्करदेखील दिला पाहिजे." गेल्या वर्षी लखनऊमध्ये झालेल्या भांडणानंतर कोहली आणि गंभीरने एकत्र दिसले. आयपीएलमधील केकेआर विरूद्ध आरसीबीचा सामना रंगणार म्हणजे विराट कोहली आणि गौतम गंभीर पुन्हा एकदा आमनेसामने येणार हे निश्चित. गेल्यावर्षीचा आयपीएलमधील वादाचा प्रसंग सर्वांनाच चांगला लक्षात होता. केकेआरविरूद्धच्या सामन्यात विराट कोहली मैदानावर प्रथम फलंदाजी करत होता तर केकेआरचा संघ गोलंदाजी करत होता. या सामन्यात स्ट्रॅटेजिक टाईम आऊटदरम्यान गंभीर कोहलीजवळ येताना दिसला, पण दोघांनी एकमेकांना मिठी मारल्याने सारेच आश्चर्यचकित झाले.

# कोलकाताचा बंगळुरूमध्ये विजयी विक्रम कायम

## केकेआरकडून आरसीबीचा 16.5 षटकांत 7 गडी राखून पराभव

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील १०वा सामना एम चिन्नास्वामी स्टेडियम पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाइट रायडर्स आमनेसामने आले होते. या सामन्यात गौतभ गंभीरच्या केकेआरने विराट कोहलीच्या आरसीबीचा ७ विकेट्सनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील सलग दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात केकेआरसाठी व्यंकटेश अय्यने (५०) तर आरसीबीसाठी विराट कोहलीने (८३*) सर्वाधिक धावांचे योगदान दिले.**



या सामन्यात कोलकाताना नाइट रायडर्स संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला फलंदाजासाठी आमंत्रित केले होते. प्रथम फलंदाजी करायला आलेल्या आरसीबी संघाने विराट कोहलीच्या नाबाद ८३ धावांच्या जोरावर ६ बाद १८२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात केकेआरने १८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना व्यंकटेश अय्यरच्या अर्धशतकाच्या जोरावर १६.५ षटकांत ३ गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केला. कर्णधार श्रेयस अय्यरने केकेआरसाठी विजयी षटकार मारला. तसेच बेंगळुरूमधील आपल्या विजयी विक्रम कायम राखला.१८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी कोलकाताला दमदार सुरुवात करून दिली. आरसीबीच्या गोलंदाजांटी धुलाई करताना दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८६ धावांची भागीदारी केली. सातव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मयंक डागरने ही भागीदारी मोडली. नरेन २२ चेंडूत ४७ धावा करून बाद झाला. त्याने २१३.६३ च्या स्ट्राईक रेटने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. त्याचवेळी फिलिप सॉल्टने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ३० धावा केल्या.

### रिंकू सिंग नाबाद राहिला

व्यंकटेश अय्यर आणि श्रेयस अय्यर यांच्यात चांगली भागीदारी झाली. संघाला तिसरा धक्का व्यंकटेशच्या रूपाने बसला. २९ चेंडूत अर्धशतक झळकावून तो पॅव्हेलियनमध्ये परतला. १६व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर यश दयालने या फलंदाजाला आपला बळी बनवले. त्याने कर्णधारासह ७५ धावांची भागीदारी केली. आयपीएलच्या १७व्या हंगामातील १०वा सामना एम चिन्नास्वामी स्टेडियम पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाइट रायडर्स आमनेसामने आले होते. रिंकू सिंग पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि पाच धावा करून नाबाद राहिला. तर श्रेयस अय्यरने षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. त्याने २४ चेंडूंचा सामना केला आणि १६२.५० च्या स्ट्राइक रेटने ३९ धावा केल्या.